# राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
## बृहन्मुंबई खंडपीठ

माहितीचा अधिकार

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

## अपील क्र. MHSICMU/२०२४/E/०००००९८

**अपिलार्थी श्री. पंचप्पा म्हाळप्पा काळे**

**विरुद्ध**

**जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी**
गृह विभाग, दुसरा मजला, मंत्रालय,
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग, मुंबई ४०० ०३२.

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा उप सचिव**
गृह विभाग, दालन क्र.२६, दुसरा मजला, मंत्रालय,
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग, मुंबई ४०० ०३२.

**<u>व्दितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : १७.११.२०२५</u>**

अपीलकर्ता : अनुपस्थित
विद्यमान जन माहिती अधिकारी : उपस्थित
प्रथम अपिलीय अधिकारी : अनुपस्थित

| मूळ अर्ज दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याचा उत्तराचा दिनांक | प्रथम अपील दिनांक | प्रथम अपील आदेश दिनांक |
|---|---|---|---|
| १५.१२.२०२३ | १९.१२.२०२३ | १६.०१.२०२४ | |

अपिलार्थी यांनी आयोगाकडे दि. ०६.०५.२०२४ रोजीच्या अर्जान्वये प्रथम अपिलीय अधिकारी यांनी आदेश पारित केलेले नाहीत असे कारण नमूद करुन द्वितीय अपील दाखल केले आहे.

२. अपिलार्थी यांनी दि. १५.१२.२०२३ रोजीच्या माहिती अर्जानुसार दि. १६.१०.२०२३ व १५.१२.२०२३ रोजी ईमेलव्दारे केलेली तक्रारीवर करण्यात आलेली कार्यवाहीची माहिती विचारली होती. जन माहिती अधिकारी यांनी माहिती न दिल्याने अपिलार्थींनी दि. १६.०१.२०२४ रोजी प्रथम अपील दाखल केले.

३. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. तथापि, त्यांनी त्यांचे लेखी निवेदन दि.०६.११.२०२५ आयोगास सादर केले. ते अभिलेखावर घेण्यात आले. जन माहिती अधिकारी उपस्थित असून त्यांनी आयोगास सादर केले की, अपिलार्थींचा दि. १५.१२.२०२३ रोजीचा माहिती अर्ज पोलीस आयुक्त, सोलापूर कार्यालयाशी संबंधीत असल्याने दि. १९.१२.२०२३ रोजी ऑनलाईन त्यांच्याकडे पाठविण्यात आला आहे व अपिलार्थी यांनी प्रथम अपिलावर उत्तर न मिळाल्याचे कारण देऊन व्दितीय अपील सादर केले. परंतु, अपिलार्थी यांचा प्रथम अपील ऑनलाईन प्रणालीवर आढळून येत नाही. अभिलेखावरुन असे निदर्शनास येते की, अपिलार्थी नमुद करतात की, त्यांनी प्रथम अपील ऑनलाईन न करता ईमेलव्दारे परस्पर गृह विभाग, पोल- १३ या कार्यासनास पाठविण्यात आली होती. परंतु, त्यांचे कार्यालयात ईमेल प्राप्त झाल्याचे दिसून येत नाही.

..२/-

४. या अपिलासंदर्भातील कागदपत्रांचे अवलोकन केल्यावर तसेच युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर आयोग या निष्कर्षावर येत आहे की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थींना माहिती/ उत्तर दिलेले आहे. सबब आयोग पुढील आदेश देत आहे:

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**मुंबई**
**दिनांक : १७.११.२०२५**

State Information Commission Greater Mumbai

**(डॉ. प्रदीप व्यास)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**